# मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

नांदेड : प्रतिनिधी

नांदेड - वाघाळा शहर महापालिकेसाठी ११ ऑक्टोबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. त्या दिवशी तरोडा खु. परिसरात दर आठवड्याला बुधवारचा बाजार भरत असतो. त्या दिवशी आठवडी बाजारावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश निवडणूक विभागामार्फत सांगण्यात आले.

निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेता या दिवशी कुठलाही आठवडी बाजार निवडणुकीच्या मतदान परिसरात भरवण्यात येऊ नये, असे आदेश निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाले असल्याने नांदेड येथील मनपा हद्दीत येणारा तरोडा खु. या परिसरात बुधवारचा बाजार भरत असतो. परंतु हा बाजार ११ ऑक्टोबर रोजी भरणार नाही यासाठी सर्व नागरिकांनी याची दखल घ्यावी, असे आयुक्तांतर्फे सांगण्यात आले आहे. दुसऱ्या ठिकाणी आठवडी बाजार भरवता येणार नाही त्यामुळे एक दिवसाची बंदी घालण्यात आली आहे.

# व्हीव्हीपॅट मशिन ४ ऑक्टोबरला दाखल होणार

**नांदेड : प्रतिनिधी**

मतदान केल्यानंतर ते कोणत्या उमेदवाराला मिळाले, याची माहिती देणारे व्हीव्हीपॅट मशिन यापूर्वी प्रात्यक्षिकसाठी शहरात महापालिकेला देण्यात आल्या होत्या. परंतु उर्वरित सगळ्या मशिन ४ ऑक्टोबर रोजी हैदराबाद येथून नांदेड येथे येणार असून यासोबत अभियंता ए.ए. खान हेदेखील येणार आहेत, अशी माहिती आयुक्तांनी पत्रपरिषदेत दिली.

व्हीव्हीपॅट अर्थात वोटर व्हेरिफाइड पेपर ऑडिट ट्रेल या मशिनचे प्रात्यक्षिक यापूर्वी देण्यात आले असून प्रभाग क्र २ मध्ये १२ इमारतीत ३७ ठिकाणी हे मशिन वापरण्यात येणार आहे. जवळपास १८९ प्रशिक्षित कर्मचारी या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले असून भारतात सर्वप्रथमच या मशिनचा उपयोग नांदेड महापालिका निवडणुकीत घेण्यात येत असल्यामुळे ४ अभियंते व पाच मास्टरमाईंड अधिकारी या ठिकाणी उपलब्ध राहणार आहेत. अचानकपणे मशिनला काही तांत्रिक बिघाड आल्यास तो निकाली काढण्यासाठी या अभियंत्यांचे मार्गदर्शन घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मतमोजणी कशी करावी यासाठी पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून व्हीव्हीपॅटची मतमोजणी ही वेगळ्या प्रकारची राहणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. यासाठी सर्व तयारी महापालिकेतर्फे करण्यात आली आहे.

शहरामध्ये ५५० मतदान केंद्र निर्माण करण्यात आले असून त्याठिकाणची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. काही प्रभागात २ तर काही प्रभागात तीन आणि चार अशा मशिन्स बसविण्यात येणार आहेत. दोन मशिन असणारे मतदान केंद्र : ६,७,१७ आहेत. तर ३ मशिन असणारे प्रभाग ११ आहेत. १,२,३,४,५,७, ११,१२,१४,१९,२० तर ४ मशिन असणारे सहा प्रभाग आहेत. त्यामध्ये ८,९,१३,१५, १६,१८ अशा पद्धतीने मतदानाच्या मशिन वाटप करण्यात येणार आहेत, असेही सांगण्यात आले आहे.

उमेदवारांनी रोजच्या रोज खर्च दाखल करणे बंधनकारक असल्यामुळे २००८च्या आदेशानुसार उमेदवारावर कारवाई करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

# उमेदवारांची आजचीच यादी अधिकृत; आयुक्तांचा खुलासा

**नांदेड : प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने गुरुवारी आयुक्त गणेश देशमुख यांनी पत्रपरिषद घेऊन अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली होती. परंतु काही निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांनी आकडेवारी योग्य न दिल्याने घाईघाईने आकडेवारी सांगण्यात आली. त्यामुळे अधिकृत उमेदवारांच्या संख्येमध्ये फरक पडला. आज मात्र अंतिम यादी तपासून पत्रपरिषदेत सादर करत आहोत त्यामुळे आजचीच यादी अधिकृत असल्याचा खुलासा शुक्रवारी आयुक्त गणेश देशमुख यांनी पत्रपरिषदेत केला.

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रसिद्धीमाध्यमांना रोज माहिती मिळावी यासाठी सायंकाळी पाच वाजता पत्रपरिषद घेतली जात आहे. गुरुवारी पत्रपरिषदेमध्ये अधिकृत उमेदवारांची आकडेवारी देण्यात आली होती. परंतु त्या आकड्यामध्ये काही राष्ट्रीय पक्षाच्या उमेदवारांच्या आकडेवारीमध्ये तफावत आढळून आल्याने आज अंतिम यादी आयुक्तांनी परिषदेमध्ये सादर केली. त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ८१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत तर भाजपा ८०, शिवसेना ७३, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी ५७, एम.आय.एम. ३२, समाजवादी पार्टी २४, बहुजन समाज पार्टी १७, अखिल भारतीय सेना ११, भारिप बमसं १०, भारतीय शेतकरी कामगार पक्ष ९, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी ७, जनता दल से. ५, इंडियन डेमोक्रेटिक मुव्हमेंट ५, प्रहार जनशक्ती ४, मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब पार्टी २, संभाजी ब्रिगेड २, मनसे १, राष्ट्रीय समाजपक्ष १, रिपब्लिन सेना १, लोकशाही जनशक्ती पार्टी १, अपक्ष ५ असे एकूण ५८१ उमेदवार महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरले असल्याची माहिती आयुक्त गणेश देशमुख यांनी यावेळी दिली.